# महाराष्ट्र शासन

## नागरिकांची सनद

## कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्रमांक: ०२२-२२६२०२३१/ २२६२०२३२

# नागरिकांची सनद

प्रशासनामध्ये नागरिक हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्यामुळे नागरिकांना प्रशासनाबाबतची पारदर्शक माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. ही माहिती एकत्रितरित्या उपलब्ध करुन मिळणे हा नागरिकाचा हक्क आहे व ती उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे . नागरिकांना अत्यावश्यक माहिती उपलब्ध करुन त्याच्या माहिती मिळविण्याच्या हक्काची जाणीव त्यांना देणे म्हणजे “नागरिक सनद” होय . राज्यातील कला शिक्षणाची माहिती तसेच नागरिकांना या कार्यालयाकडून थेट कोणत्या सेवा दिल्या जातात याबाबतची माहिती या नागरिकांच्या सनदेद्वारे उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने ही नागरिक सनद प्रसिध्द करण्यात येत आहे .

२. राज्यातील कला शिक्षणामध्ये कार्यरत असलेल्या संस्था, त्यांचे मार्फत राबविण्यात येणारे अभ्यासक्रम, प्रवेशासाठी अर्हता व अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या संधी यांचा परामर्श या सनदेत घेण्यात आला आहे. कला संचालनालय ही कला शिक्षणाच्या उन्नतीसाठी व कलाशिक्षणात सुसूत्रता आणण्यासाठी प्रस्थापित शासकीय यंत्रणा असून नागरिकांची कला शिक्षणाची गरज भागविण्याचे कार्य राबविते .

३. शिक्षणातील इतर प्रवाहांप्रमाणेच कला शिक्षण हा एक प्रवाह आहे. या शिक्षण प्रवाहाची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यासाठी उपलब्ध असलेल्या संधी व सोईसुविधा तसेच व्यवहारातील त्याची उपयुक्तता या महत्वाच्या गोष्टी जनतेसमोर ठेवणे आवश्यक असल्यामुळे कला शिक्षणाची माहिती याव्दारे नागरिकांची सनद या रुपाने प्रसिध्द करण्यात येत आहे . सर्वसामान्य जनतेमध्ये कलेची अभिरुची निर्माण करुन कला रसिक बनविणे हे कला शिक्षणाचे ध्येय आहे .

४. कला शिक्षणाच्या प्रसाराचे काम कला संचालनालयामार्फत महाराष्ट्रात करण्यात येत असून अखिल भारतीय स्तरावर महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे की, ज्या ठिकाणी कलेच्या शास्त्रोक्त प्रचार / प्रसारासाठी स्वतंत्र कला संचालनालयाची स्थापना माहे जून, १९६५ मध्ये महाराष्ट्र शासनाने केली आहे. या संचालनालयामार्फत राज्यातील शासनमान्यताप्राप्त कला संस्थांतील विद्यार्थ्यांसाठी राज्य कला प्रदर्शन ( विद्यार्थी विभाग ), कला शिक्षणासाठी नवीन कला संस्था निर्माण करणे, त्यांना अनुदान मंजूर करणे, कला अभ्यासक्रमाची आखणी करणे व राबविणे, विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना पदविका देणे तसेच व्यावसायिक कलाकारांसाठी राज्यकला प्रदर्शन भरविणे व राज्यातील दृश्य कलांचे जतन व जपणूक करणे, कलाकारांना प्रोत्साहन देणे इत्यादी कला संचालनालयाची प्रमुख वैशिष्टे / कामे आहेत .

५. कला संचालनालयाचे मुख्य कार्यालय सर ज . जी . कला शाळा आवारात वसले असून त्यांच्या अखत्यारीत मुंबई मध्ये दोन, नागपूर व औरंगाबाद येथे प्रत्येकी एक शासकीय कला महाविद्यालये चालविले जातात. त्या व्यतिरिक्त राज्यातील बहुतेक जिल्हयांमध्ये कला शिक्षण संस्थांना शासनमान्यता देण्यात आली असून त्यामध्ये ३१ अनुदानित कला संस्था व १७८ विनाअनुदानित कला संस्था आहेत. समाजाची कला शिक्षणाची गरज लक्षात घेऊन वेळोवेळी नवीन कला संस्थाना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात येते .

६. कला शिक्षणाचे अभ्यासक्रम पदव्यूत्तर पदवी, पदवी आणि पदविका या स्तरावर उपलब्ध असून ते संबंधित विद्यापीठाशी संलग्न आहेत. त्याचप्रमाणे कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व शासनमान्य अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला संस्थांमध्ये शिकविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**अ) शासकीय कला महाविद्यालये :-**

**१) सर ज . जी . कला महाविद्यालय , मुंबई.**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | अभ्यासक्रमाचा कालावधी | प्रवेश पात्रता |
|---|---|---|---|
| | **पदव्युत्तर पदवी** | | |
| १ | रेखा व रंगकला | २ वर्षे | १)बी.एफ.ए. रेखा व रंगकला पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| | **पदवी** | | |
| १ | रेखा व रंगकला | ४ वर्षे | १)उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ४५%(खुला प्रवर्ग) व ४०% (मागास प्रवर्ग) गुणांसह उत्तीर्ण; |
| २ | शिल्पकला | ४ वर्षे | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | मातकाम | ४ वर्षे | २)बी.एफ.ए. सामाईक प्रवेश परीक्षा उत्तीर्ण. |
| ४ | धातूकाम | ४ वर्षे | |
| ५ | वस्त्रकाम | ४ वर्षे | |
| ६ | अंतर्गत गृहसजावट | ४ वर्षे | |
| | **पदविका** | | |
| १ | शिल्पकला व प्रतिमानबंध | ४ वर्षे | मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण. |
| २ | कला शिक्षक प्रशिक्षण | २ वर्षे | १)उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण;<br>२)इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण अथवा प्रविष्ठ. |
| ३ | कला शिक्षणशास्त्र | १ वर्षे | बी.एफ.ए. पदवी अथवा पदविका (जी.डी.आर्ट) उत्तीर्ण. |
| | **प्रमाणपत्र अभ्यासक्रम** | | |
| १ | आर्ट मास्टर अंशकालीन | १ वर्षे | १)कला शिक्षक प्रशिक्षण पदविका अर्हताधारक कला शिक्षकास ३ वर्षे शिकविण्याचा अनुभव आवश्यक<br>२)बी.एफ.ए.पदवी अथवा पदविका(जी.डी.आर्ट) अर्हताधारक कला शिक्षकास ५ वर्षे शिकविण्याचा अनुभव आवश्यक. |

**२)सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | अभ्यासक्रमाचा कालावधी | प्रवेश पात्रता |
|---|---|---|---|
| | **पदव्युत्तर पदवी** | | |
| १ | उपयोजित कला | २ वर्षे | १)बी.एफ.ए. उपयोजित कला पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| | **पदवी** | | |
| १ | उपयोजित कला | ४ वर्षे | १)उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण;<br>२)बी.एफ.ए. सामाईक प्रवेश परीक्षा उत्तीर्ण. |
| | **अंशकालीन** | | |
| १ | छायाचित्रण | १ वर्षे | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. |
| २ | अंतर्गत गृहसजावट | १ वर्षे | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. |

**३)शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | अभ्यासक्रमाचा कालावधी | प्रवेश पात्रता |
|---|---|---|---|
| | **पदव्युत्तर पदवी** | | |
| १ | रेखा व रंगकला | २ वर्षे | १)बी.एफ.ए. रेखा व रंगकला पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| २ | उपयोजित कला | २ वर्षे | १)बी.एफ.ए. उपयोजित कला पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| ३ | शिल्पकला | २ वर्षे | १)बी.एफ.ए. शिल्पकला पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| ४ | इंटेरिअरडेकोरेशन | २ वर्षे | १)बी.एफ.ए. इंटेरीअर डेकोरेशन पदवी परीक्षाउत्तीर्ण |
| | **पदवी** | | |
| १ | रेखा व रंगकला | ४ वर्षे | १)उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ४५%(खुला प्रवर्ग) व ४०% (मागास प्रवर्ग) गुणांसह उत्तीर्ण ;<br>२)बी.एफ.ए. सामाईक प्रवेश परीक्षा उत्तीर्ण. |
| २ | उपयोजित कला | ४ वर्षे | |
| | पदविका | | |
| १ | कला शिक्षक प्रशिक्षण | २ वर्षे | १)उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण;<br>२)इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण अथवा प्रविष्ठ |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रमाणपत्र अभ्यासक्रम | | |
| १ | आर्ट मास्टर (सुट्टीतील) | ३ वर्षे | १)कला शिक्षक प्रशिक्षण पदविका अर्हताधारक कला शिक्षकास ३ वर्षे शिकविण्याचा अनुभव आवश्यक.<br>२)बी.एफ.ए.पदवी अथवा पदविका(जी.डी.आर्ट) अर्हताधारक कला शिक्षकास ५ वर्षे शिकविण्याचा अनुभव आवश्यक. |

**४)शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | अभ्यासक्रमाचा कालावधी | प्रवेश पात्रता |
|---|---|---|---|
| | **पदव्युत्तर पदवी** | | |
| १ | रेखा व रंगकला | २ वर्षे | १)बी.एफ.ए. रेखा व रंगकला पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| २ | उपयोजित कला | २ वर्षे | १)बी.एफ.ए. उपयोजित कला पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| | **पदवी** | | |
| १ | रेखा व रंगकला | ४ वर्षे | १)उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ४५%(खुला प्रवर्ग) व ४०% (मागास प्रवर्ग) गुणांसह उत्तीर्ण,<br>२)बी.एफ.ए. सामाईक प्रवेश परीक्षा उत्तीर्ण. |
| २ | उपयोजित कला | ४ वर्षे | |
| ३ | वस्त्रकाम | ४ वर्षे | |
| | **पदविका** | | |
| १ | कला शिक्षक प्रशिक्षण | २ वर्षे | १)उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण<br>२)इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण अथवा प्रविष्ठ |

**ब) शासनमान्य अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला महाविद्यालये-**

कला संचालनालयाच्या अधिपत्याखाली ३१ शासनमान्य अशासकीय अनुदानित व १७८ विनाअनुदानित कला महाविद्यालये मान्यताप्राप्त आहेत. सदर कला महाविद्यालयांमध्ये पदविका अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते. पदविका अभ्यासक्रमांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**पदविका अभ्यासक्रम-**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | अभ्यासक्रमाचा कालावधी | प्रवेश पात्रता |
|---|---|---|---|
| १ | रेखा व रंगकला | ४ वर्षे | १ वर्षाचा मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| २ | उपयोजित कला | ४ वर्षे | १ वर्षाचा मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ३ | शिल्पकला व प्रतिमानबंध | ४ वर्षे | १ वर्षाचा मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ४ | मातकाम | २ वर्षे | १ वर्षाचा मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ५ | धातूकाम | २ वर्षे | १ वर्षाचा मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ६ | वस्त्रकाम | २ वर्षे | १ वर्षाचा मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ७ | अंतर्गत गृहसजावट | २ वर्षे | १ वर्षाचा मुलभूत अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ८ | कला शिक्षक प्रशिक्षण | २ वर्षे | १)उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण<br>२)इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण अथवा प्रविष्ठ |
| ९ | कला शिक्षणशास्त्र | १ वर्षे | बी.एफ.ए. पदवी अथवा पदविका (जी.डी.आर्ट) उत्तीर्ण |
| | **प्रमाणपत्र अभ्यासक्रम** | | |
| १ | आर्ट मास्टर (सुट्टीतील) | ३ वर्षे | १)कला शिक्षक प्रशिक्षण पदविका अर्हताधारक कला शिक्षकास ३ वर्षे शिकविण्याचा अनुभव आवश्यक.<br>२)बी.एफ.ए.पदवी अथवा पदविका (जी.डी.आर्ट) अर्हताधारक कला शिक्षकास ५ वर्षे शिकविण्याचा अनुभव आवश्यक. |
| २ | आर्ट मास्टर अंशकालीन | १ वर्षे | |

* प्रवेशाबाबतचे नियम:-

१) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम-

वरील कोष्टकामध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या कला महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शिकविले जातात त्याच कला महाविद्यालयाच्या स्तरावर प्रवेश प्रक्रिया राबविली जाते.

२) पदवी अभ्यासक्रम -

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील ४ शासकीय तसेच राज्यातील संबंधित विद्यापीठाशी संलग्नीत ७ खाजगी कला महाविद्यालयांमध्ये दृष्य कलेचे बी.एफ.ए.पदवी अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते. सदर अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण/१११९/प्र.क्र.०३/१७/तांशि-६, दि.२५.०४.२०१७ नुसार शासन अधिसूचना दि.२४.०४.२०१७ च्या प्रवेश नियमातील प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करुन मा.आयुक्त,राज्य सामाईक प्रवेश परीक्षा प्राधिकरण,मुंबई यांचेमार्फत दरवर्षी सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे बी.एफ.ए. प्रथम वर्ष अभ्यासक्रमांचे प्रवेश केले जातात. प्रवेशाबाबतचे नियमांची इत्यंभूत माहिती प्राधिकरणाच्या www.mahacet.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३)पदविका अभ्यासक्रम -

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र.एडीआर-२०२१/प्र.क.४८/तांशि-६, दि.९.८.२०२१ अन्वये कला संचालनालयाच्या नियंत्रणाखालील कला महाविद्यालयांकडून राबविण्यात येणा-या दृष्यकला पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून केंद्रीय पद्धतीने, ऑनलाईन स्वरुपात करण्यास शासन मान्यता दिल्यानुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे

*** शासकीय उच्चकला परीक्षा:-**

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला महाविद्यालयांमध्ये दृष्य कलेचे पदविका अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते. पदविका अभ्यासक्रमांची परीक्षा प्रक्रिया कला संचालनालयामार्फत राबविण्यात येते. विद्यार्थ्यांची नोंदणी करणे, परीक्षा आयोजित करणे, निकाल घोषित करणे, गुणपत्रक, प्रमाणपत्र वितरीत करणे इ. परीक्षेसंबंधीची कामे कला संचालनालयाकडून करण्यात येतात.

*** शासकीय रेखाकला परीक्षा:-**

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये कला विषयाची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने कला संचालनालयामार्फत दरवर्षी माहे सप्टेंबर मध्ये अखिल भारतीय स्तरावर एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा घेण्यात येतात. दरवर्षी सदर परीक्षांना अंदाजे ७.००लक्ष विद्यार्थी प्रविष्ट होतात. विद्यार्थ्यांची नोंदणी करणे, परीक्षा आयोजित करणे, निकाल घोषित करणे, प्रमाणपत्र वितरीत करणे इ. शासकीय रेखाकला परीक्षेसंबंधीची कामे कला संचालनालयाकडून करण्यात येतात.

*** खाजगी कला महाविद्यालयांना मान्यता देणे:-**

नविन कला संस्था / जुन्या कला संस्थेत नवीन अभ्यासक्रम / नविन तुकडी सुरु करण्यास मान्यता देण्यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.एडीआर-२०१४/प्र.क्र.१८८/तांशि-६, दि.१६.०३.२०१६ अन्वये कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. तसेच कला संचालनालयाच्या कक्षेतील नवीन कला महाविद्यालयांना मान्यता देणे, जुन्या कला महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देणे, परीक्षा केंद्र देणे अथवा बंद करणे यासाठी शासन निर्णय क्र.एडीआर २७१४/प्र.क्र.२२/१७/तांशि-६, दि.२२/०९/२०१७ अन्वये संचालकांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स समिती गठित करण्यात आली आहे. त्यानुसार खाजगी कला महाविद्यालयांना मान्यता देण्याबाबतची कार्यवाही कला संचालनालयाकडून करण्यात येते. तसेच शासन निर्णय क्र.एडीआर १४०६(१/६)साशि-५, दि.०५/०७/२००६ अन्वये कला संचालनालयाकडे विविध व्यवस्थापनांकडून नवीन संस्था/अभ्यासक्रम/तुकडी तसेच कला विषयातील नवीन विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जासाठी नोंदणी शुल्क आकारण्यात येते. वर नमूद सर्व शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

*** राज्य कला प्रदर्शन:-**

राज्यातील व्यावसायिक कलाकार तसेच राज्यातील शासन मान्यताप्राप्त कला महाविद्यालयांतील विद्यार्थी यांच्या कला प्रदर्शित करण्यासाठी व त्यांच्या प्रतिभा शक्तीला हक्काचे व्यासपीठ असावे तसेच त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे या हेतूने कला संचालनालयामार्फत सन १९६५ पासून दरवर्षी कलाकार विभाग व विद्यार्थी विभाग या दोन विभागांमध्ये राज्यस्तरीय कला प्रदर्शन आयोजित करण्यात येते. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील कला क्षेत्रात अव्याहतपणे आणि निष्ठेने कार्य करणा-या ज्येष्ठ कलाकारांचा सत्कार करण्याची प्रथा या प्रदर्शनानिमित्ताने शासनातर्फे सन १९८५ पासून सुरु करण्यात आली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.ओडीआर-२०१६/प्र.क्र.४५/तांशि-६, दि.२३.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनामध्ये देण्यात येणारी पारितोषिके आणि गौरव मानधनाच्या रकमेत सुधारणा करुन वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार कलाकार व विद्यार्थी विभागातील पारितोषिक विजेते कलाकार व विद्यार्थी यांना पारितोषिक रक्कम अदा करण्यात येते.

तसेच महाराष्ट्रातील कला क्षेत्रात अव्याहतपणे आणि निष्ठेने कार्य करणा-या ज्येष्ठ दोन कलाकारांचा कलाकार व विद्यार्थी विभागात प्रत्येकी १ या प्रमाणे गौरव मानधन, शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येतो. क्र.अेडीआर-२०१६/प्र.क्र.४५/तांशि-६,दि.२३.०१.२०१९ चा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

*** वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार:-**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.एडीआर-२०१९/प्र.क्र.९४/तांशि-६, दि.०२.०१.२०२० अन्वये दृष्यकला क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या नामवंत व ज्येष्ठ कलाकारांचा यथोचित सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने सन २०१९-२० पासून रु.५.००लक्ष, सन्मानचिन्ह व मानपत्र या स्वरुपात पुरस्कार देण्यास शासनमान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासनाच्या वतीने कला संचालनालयामार्फत सदर पुरस्कार राज्य कला प्रदर्शनातील कलाकार विभागाच्या उदघाटन प्रसंगी देण्यात येतो.

*** दुर्मीळ व ऐतिहासिक कलाकृती / पेंटिंगचे जतन व संवर्धन करणे :-**

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई येथे ख्यातनाम चित्रकारांच्या सुमारे २५०० ऐतिहासिक, दुर्मीळ व मौल्यवान कलाकृती उपलब्ध आहेत. सदर दुर्मीळ व मौल्यवान कलाकृतींचे जतन व संवर्धन करण्यासाठी वार्षिक योजनेतून दरवर्षी शासनाकडून निधी मंजूर करण्यात येतो. त्यानुसार सदर निधीमधून दुर्मिळ व मौल्यवान कलाकृतींचे जतन व संवर्धन करण्यात येते. कला संचालनालयामधील दुर्मीळ व मौल्यवान कलाकृतींचा संग्रह हा ललित कला क्षेत्रात शैक्षणिकदृष्ट्या, तसेच कलाजगतास मार्गदर्शक असा मौल्यवान ठेवा आहे. सदर कलाकृतींचे संवर्धन करण्यात आल्यामुळे त्या कलाकृती विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून दीर्घकाळ उपलब्ध होतील.

*** बाल चित्रकला स्पर्धा:-**

बालकांच्या सर्वांगीण विकासासोबतच त्यांच्यामध्ये कला विषयक अभिरुची निर्माण व्हावी याकरिता दरवर्षी ऑगस्ट महिन्यात शालेय स्तरावर बाल चित्रकला स्पर्धा निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत आयोजित करण्यात येते. सन १९७० पासून स्वर्गीय पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून दरवर्षी १४ नोव्हेंबर रोजी या स्पर्धेतील बक्षीस विजेते विद्यार्थ्यांना बक्षीसे वितरित करण्यात येतात. स्पर्धेतील उत्कृष्ट कलाकृतींना चार गटात प्रत्येक गटात ३ बक्षीसे याप्रमाणे एकूण १२ बक्षीसे देण्यात येतात. तसेच २० स्पर्धकांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्र देण्यात येतात.

कला संचालनालयाची शासनाच्या प्रशासकीय विभागापर्यंतची रचना खालीलप्रमाणे आहे.

मा.मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

↓

मा.प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

↓

मा.उपसचिव

↓

मा.कला संचालक

↓

- कला उप संचालक (प्रशा.)
  - स्वीय सहायक
  - परीक्षा नियंत्रक मुंबई
  - सहाय्यक निरीक्षक कला संचालनालय
  - लेखा अधिकारी
- निरीक्षक चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई
  - (सहाय्यक निरीक्षक, मुंबई)
    - सहाय्यक निरीक्षक विभागीय कार्यालय, नागपूर
    - सहाय्यक निरीक्षक विभागीय कार्यालय, औरंगाबाद
- १. अधिष्ठाता, सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई
  २. अधिष्ठाता, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई
  ३. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
  ४.अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महविद्यालय, औरंगाबाद
  - प्रबंधक (संस्थानिहाय प्रत्येकी १ एकूण ४)

कला संचालनालयामार्फत जनतेस पुरविण्यात येणा-या सेवांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविण्याकरिता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | राज्यातील विविध गावात, शहरात, सार्वजनिक ठिकाणी राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ति यांचे पुतळे उभारताना पुतळ्याच्या क्ले मॉडेलला मान्यता देणे. | संबंधित संस्थेचा लेटरहेडवर प्रस्ताव (कोणातर्फे, कोणत्या ठिकाणी व कोणाचा पुतळा उभारावयाचा आहे, कोणी तयार केला या बाबींचा उल्लेख असावा) | १. श्री.विनोद दांडगे, कला उपसंचालक (प्रशा.)<br>२. श्री.मंगेश कदम, प्रमुख लिपिक | अर्ज प्राप्त झाल्यानंतर १० दिवसात तज्ञांची नेमणूक केली जाते. तज्ञांच्या अहवालानंतर १० दिवसामध्ये मान्यता देण्यात येते. | श्री.राजीव मिश्रा, कला संचालक |
| २. | कला संचालनालयामार्फत राबविण्यात येणारे पदविका/ प्रमाणपत्र अभ्यासक्रम/ तुकडी सुरु करण्यासाठी नोंदणीकृत संस्थांना शासन मान्यता देणे. | १. संस्थेचा लेटरहेडवर प्रस्ताव<br>२. संस्था नोंदणी प्रमाणपत्र,<br>३. संस्थेचा ठराव, ४. वित्तीय स्थैर्य दर्शविणारी कागदपत्रे<br>५. जागा संबंधी कागदपत्रे<br>६. इमारतीचे छायाचित्र<br>७.शासन निर्णयातील इतर कागदपत्रे | | उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय दि.१६.०३.२०१६ अनुसार माहे ऑक्टोबर अखेरपर्यंत प्रस्तावासाठी वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात येते. तदनंतर अर्ज वितरीत करणे व स्विकारणे पासून ते शासनास प्रस्ताव सादर करणे, शासन मान्यतेनंतर संस्थेस मान्यता प्रदान करणे इ.प्रक्रिया माहे जून अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येते. | |
| ३. | दककला क्षेत्रातील कलाकारांना कलाकार प्रमाणपत्र निर्गमित करणे. | १) अर्ज<br>२) शैक्षणिक कागदपत्रे<br>३) १५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळ या क्षेत्रात काम करीत असल्याचा पुरावा<br>४) संबंधिताची उपजिविका या कलेवर अवलंबून आहे याचा पुरावा म्हणून प्रतिज्ञापत्र. | | अर्ज केल्यानंतर १० दिवसात संबंधित महाविद्यालयाकडे पाठविले जाते. संबंधित महाविद्यालयाकडील समितीच्या अहवालानंतर १५ दिवसामध्ये मान्यता देण्यात येते. | |
| ४. | ४ वर्षाचा पदविका अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या | १) स्वत:चा अर्ज<br>२) शैक्षणिक कागदपत्रे | | अर्ज केल्यानंतर २० दिवसात. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | विद्यार्थ्यांना पुढील ब्रीज कोर्सच्या शिक्षणासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | | | | |
| ५. | शासकीय रेखाकला (Elementary & Intermediate Drawing Grade) परिक्षांच्या प्रमाणपत्रातील दुरुस्ती करणे. | १)परिक्षा केंद्र प्रमुखाचे लेटरहेडवरील तपशिलवार पत्र,<br>२)मुळ प्रमाणपत्र,<br>३) महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी रु.१००/- व महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी रु.२००/- चा डी.डी.<br>४)प्रतिज्ञापत्र<br>५)बोनाफाईड सर्टीफिकेट/ जनरल रजिस्टरचा उतारा. | १)श्री.ना.म. वाघमोडे, परिक्षा नियंत्रक<br>२)श्री.विजय राणे, अधीक्षक<br>३)श्री.विनोद सावंत, प्रमुख लिपिक | पत्र प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसात | श्री.राजीव मिश्रा, कला संचालक |
| ६ | शासकीय रेखाकला (Elementary & Intermediate Drawing Grade) परिक्षांचे दुय्यम प्रमाणपत्र देणे. | १)स्वत:चा अर्ज.<br>२)महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी रु.१००/- व महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी रु.२००/- चा डी.डी.<br>३)प्रतिज्ञापत्र<br>४)प्रमाणपत्र गहाळ झाल्याचे संबंधित पोलीस ठाण्याचा दाखला. | | | |
| ७ | शासकीय उच्च कला परिक्षांच्या गुणपत्रक/प्रमाणपत्रातील दुरुस्ती करणे. | १)प्राचार्य यांचे लेटरहेडवरील तपशिलवार पत्र.<br>२)मुळ प्रमाणपत्र/गुणपत्रक<br>३) जनरल रजिस्टरचा उतारा. | १)श्री.ना.म. वाघमोडे, परिक्षा नियंत्रक<br>२)श्री.विजय राणे, अधीक्षक<br>३)श्री.चरण पवार, प्रमुख लिपिक | पत्र प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसात | श्री.राजीव मिश्रा, कला संचालक |
| ८ | शासकीय उच्च कला परिक्षांचे दुय्यम गुणपत्रक/ प्रमाणपत्र देणे. | १)स्वत:चा अर्ज.<br>२)गुणपत्रकासाठी रु.२०/- व प्रमाणपत्रासाठी रु.५०/- चा डी.डी.<br>३)प्रतिज्ञापत्र<br>४)प्रमाणपत्र गहाळ झाल्याचे संबंधित पोलीस ठाण्याचा दाखला. | | | |

कला संचालनालय व कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांचे पदनाम व दूरध्वनी क्रमांक

## कला संचालनालय

| अ.क्र . | अधिका-याचे नांव | अधिकाऱ्याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्री.राजीव मिश्रा | कला संचालक | ०२२-२२६२१२२५ |
| २ | श्री.विनोद दांडगे | कला उपसंचालक ( प्रशासकीय ) | ०२२-२२६२०२३१ / ३२ |
| ३ | श्री.सुरेश पवार | स्वीय सहाय्यक | ०२२-२२६२०२३१ / ३२ |
| ४ | श्री.नागेश वाघमोडे | परीक्षा नियंत्रक | ०२२-२२६२०२३१ / ३२ |
| ५ | श्री.संदिप डोंगरे | सहाय्यक निरीक्षक | ०२२-२२६२०२३१ / ३२ |
| ६ | श्रीमती अश्लेषा जाधव | लेखा अधिकारी | ०२२-२२६२०२३१ / ३२ |

**निरीक्षक , चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई :**

| अ.क्र | अधिका-याचे नांव | अधिका - याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्री.संदिप डोंगरे | निरीक्षक | ०२२-२२६२०३०४ |
| २ | श्रीमती आरती श्रावस्ती | सहाय्यक निरीक्षक | ०२२-२२६२०३०४ |

**सहाय्यक निरीक्षक , विभागीय कार्यालय, नागपूर :**

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | अधिका - याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्री.संदिप डोंगरे | सहाय्यक निरीक्षक | ०७१२-२२२४६८० |

**सर ज.जी. कला महाविद्यालय , मुंबई :**

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | अधिका - याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | प्रा.वि.डों.साबळे | अधिष्ठाता | ०२२-२२६२१६५२ |
| २ | रिक्त | प्रबंधक | ०२२-२२६२१६५२ |

**सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय , मुंबई :**

| अ.क्र . | अधिका-याचे नांव | अधिकाऱ्याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | डॉ.संतोष क्षीरसागर | अधिष्ठाता | ०२२-२२६२०५८६ |
| २ | श्री.नागेश वाघमोडे | प्रबंधक | ०२२-२२६२१२७६ /७७ |

**अधिष्ठाता , शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर:**

| अ.क्र | अधिका-याचे नांव | अधिका - याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्री.वि.वा.मानकर | अधिष्ठाता | ०७१२-२२२४६८० |
| २ | श्री.नरेश ढोबळे | प्रबंधक | ०७१२-२२२४६८० |

**अधिष्ठाता , शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद :**

| अ.क्र | अधिका-याचे नांव | अधिका - याचे पदनाम | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | प्रा.रमेश सु.वडजे | अधिष्ठाता | ०२४०-२४०२५२५ |
| २ | श्री.विनोद दांडगे | प्रबंधक | ०२४०-२४०२५२५ |

-----x-----